**जाहिरात :-**

# शुध्दीपत्रक

**पोलीस आयुक्त कार्यालय,औरंगाबाद शहर,येथील विधी अधिकारी गट-अ, गट-ब व विधी अधिकारी यांची रिक्त पदे पुर्णत: कंत्राटी पध्दतीने भरणे बाबत.**

जा.क्र.कक्ष-१(१)विधी अधि.गट-अ,गट-ब/विधीअधि./पदे/जाहिरात/२०२२-66 औरंगाबाद दि. 21/०१/२०२२

पोलीस आयुक्त औरंगाबाद शहर,कार्यालयाच्या आस्थापनेवर विधी अधिकारी गट-अ-१, गट-ब-१, व विधी अधिकारी २ यांची रिक्त पदे, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय,गृहविभाग,क्र.एसपीपी २००५/प्र.क्र.२४७/पोल-१०/ दि.१५/०९/२००६ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार, ११ महिण्याचे करारावर पुर्णत:कंत्राटी पध्दतीने भरावयाची आहेत. त्या करीता वर्तमान पत्रातुन जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच सदरची जाहिरात ही दैनिक दिव्य मराठी या वृतपत्रात दिनांक १८/०१/२०२२ रोजी प्रसिध्द झालेली असुन सदरची सविस्तर जाहिरात या कार्यालयाचे संकेत स्थळ aurangabadcitypolice.gov.in व मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई कार्यालयाचे संकेत स्थळ mahapolice.gov.in वर सुध्दा प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच सदर पदाकरीता अर्ज या कार्यालयचे ई मेल cp.aurangabad@mahapolice.gov.in वर दिनांक २०/०१/२०२२ पर्यंत ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले होते. व त्यानुसार प्राप्त होणा-या विधी अधिकारी या पदासाठी अर्जदारांची विधी अधिकारी पदाची मुलाखत दिनांक २४/०१/२०२२ रोजी ठेवण्यात आली होती.

सध्या कोविड-१९ चा प्रादुर्भाव वाढत असल्याने सदर जाहिरातीमध्ये अंशत: बदल करण्यात येत असुन ऑनलाईन अर्ज करण्याची तारीख वाढविण्यात आली असुन दिनांक ०४/०२/२०२२ पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत मागविण्यात येत आहेत . त्यानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही तसेच सदर पदाकरीता मुलाखत दिनांक ०९/०२/२०२२ रोजी सकाळी १०.३० वाजता पोलीस आयुक्त कार्यालय औरंगाबाद शहर,मिल कॉर्नर येथे घेण्यात येणार आहे.

( अपर्णा गिते )
पोलीस उप आयुक्त,(मुख्यालय)
औरंगाबाद शहर.

Scanned with CamScanner